# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## सार्वजनिक आरोग्य विभाग

दुरध्वनी क्रमांक:- ०२५३-२३१७२९२ / २२२२५३३
ई-मेल आयडी :- nmcmsmd@nmc.gov.in, nmcmsmd@gmail.com

कार्यालय :- ३ रा मजला, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक - ४२२००२

NMC/PUBHLTHMED/OWL/ /2026 जा.क्र./सा.आ.वि./वशि/डेस्क-६/ 923 /२०२६,
दिनांक :- 29 /०१/२०२६.

**आदेश क्रमांक :** 122

संदर्भ : १. मा. आयुक्त तथा प्रशासक सो., मनपा नाशिक यांची मान्यता.
२. मा. महासभा ठराव क्र.४५६, दि.०७.११.२०२५
३. मा. स्थायी समिती ठराव क्र.३८१, दि.०७.११.२०२५

सार्वजनिक आरोग्य विभाग, नाशिक महानगरपालिका अंतर्गत रुग्णालये/दवाखाने येथे खालील तपशिलातील 'स्टाफ नर्स' यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर दि.२१/०१/२०२६ ते दि.०९/०६/२०२६ पावेतो या कालावधीकरिता खालील नमुद अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेत येत आहे.

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | कामकाजाचे ठिकाण |
|---|---|---|
| ०१ | योगिता बाळू पाडवी | इंदिरा गांधी रुग्णालय,पंचवटी,नाशिक |
| ०२ | स्वाती विलास पवार | इंदिरा गांधी रुग्णालय,पंचवटी,नाशिक |
| ०३ | मंगला लहू बागुल | डॉ.झाकीर हुसेन रुग्णालय,कथडा,नाशिक |
| ०४ | सुवर्णा अनिल राजगुरू | श्री स्वामी समर्थ रुग्णालय,मोरवाडी,नाशिक |
| ०५ | कला भास्कर पाडवी | मायको सातपूर,नाशिक |
| ०६ | ललिता बाबुराव पावरा | हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णायल |
| ०७ | मनिता माणिक गावित | हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णायल |
| ०८ | आरती राजेंद्र बस्ते | हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णायल |
| ०९ | सुरेखा मोग्या पाडवी | हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णायल |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे - डॉ.झाकीर हुसेन रुग्णालय,कथडा,नाशिक

२१) निवड झालेला उमेदवार ०७ दिवसांत (दि. २८/०१/२०२६ रोजी पावेतो) रुजु न झाल्यास प्रतिक्षा यादीमधुन पुढिल उमेदवारास नियुक्ती देणेत येईल व या बाबत कुठलीही प्रकारची तक्रार दाखल करुन घेतली जाणार नाही.

२२) मानधन कर्मचारी यांनी कामाचे ठिकाणी रुजू होतांना संबंधित बिल लिपिक यांचेकडे विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. सद्यःस्थितीत आपणावर कुठल्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नाही, याबाबत प्रतिज्ञापत्रात नमूद करावे. तसेच भविष्यात गुन्हा नोंद झाल्यास अथवा मागील गुन्हा आढळल्यास, नियुक्ती त्याक्षणी संपुष्टात येईल.

२३) नियुक्त मानधन कर्मचारी हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा. नियुक्त मानधन कर्मचारी यांनी रुजू झालेनंतर २ आठवडयात सक्षम प्राधिकृत वैद्यकिय अधिकारी यांचेकडील शारीरीक / मानसिक दृष्टया तंदुरुस्त असलेबाबतचा दाखला संबंधित बिल लिपीक यांचेकडे सादर करावा अन्यथा नियुक्ती रद्द करणेत येईल.

२४) तसेच नियुक्त झालेनंतर संबंधित मानधन कर्मचारी यांनी रुजू अहवालाची व नियुक्तीची एक प्रत तसेच प्रत्येकी ३ प्रतींमध्ये आधारकार्ड, पॅनकार्ड, बँकेचे पासबुकची पहिल्या पानाची छायांकित प्रत व एक कॅन्सल चेक व्यक्तिशः आपल्या रुग्णालयातील संबंधित बिल लिपिक यांना मानधन अदा करणेकामी १ आठवडयात माहिती सादर करावी. वरील कागदपत्रांसह RTGS Form भरुन देणे बंधनकारक राहील.

२५) सदर नियुक्ती दि. २१/०१/२०२६ ते दि.०९/०६/२०२६ पावेतो अथवा नियमित सरळसेवेची भरती यापैकी अगोदर जे होईल तो पावेतो आदेश कार्यान्वित राहील. तदनंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्याकरीता वेगळा आदेश देण्यात येणार नाही किंवा वैयक्तीकरित्या कळविणेत येणार नाही.

२६) सदर पदाचे एकत्रित मानधन २०,०००/- (वीस हजार रु. फक्त) इतके राहील. या व्यतिरिक्त कुठल्याही प्रकारचे भत्ते अथवा इतर लाभ मिळणार नाही. शासन नियमाप्रमाणे स्थायी कर्मचारी यांना मिळणारा लाभ या मानधनावरील पदांना मिळणार नाही.

२७) सदरची सेवा ही तात्पुरत्या स्वरुपाची आहे. सदर बाबतीत मानधनावरील कर्मचारी यांना महानगरपालिकेत नोकरीत कुठल्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही. मानधनावर नियुक्त केलेल्या कर्मचारी यांची महानगरपालिकेवर कुठल्याही प्रकारचे दायित्व राहणार नाही.

२८) मानधनावरील कर्मचारी यांनी दररोज नेमणुक असलेल्या दवाखान्यात/रुग्णालयात मनपाचे बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदवावी. हजेरीची नोंद नसल्यास मानधन काढण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच कार्यालयात ठेवण्यात आलेल्या हजेरीपत्रकावर सुध्दा स्वाक्षरी करणे बंधनकारक राहील.

२९) नाशिक महानगरपालिकेतर्फे रोग निदान शिबीर, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर इ. आयोजित केली असता शिबिराच्या ठिकाणी हजर राहुन रुग्णांना सेवा देणे बंधनकारक राहील. तसेच सर्व राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सक्रीय सहभाग घ्यावा लागेल.

३०) ज्या मानधनावरील कर्मचारी यांची कर्तव्यात अनियमितता आढळुन येईल अथवा रुग्णांकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियमानुसार दखल घेऊन पुढील कारवाई करणेत येईल.

३१) मानधन कर्मचारी यांचे वर्तन व आचरण हे सह कर्मचारी / वरिष्ठ अधिकारी / रुग्ण / रुग्णाचे नातेवाईक / नागरिक यांचेशी सभ्य असावे. कुठल्याही प्रकारचा वाद आढळल्यास अथवा असभ्य वर्तन आढळल्यास नियुक्ती रद्द करणेत येईल.

३२) मानधन कर्मचारी यांना नमुद केलेले कामकाजाचे ठिकाण हे तात्पुरत्या स्वरुपात असुन महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार त्यात वेळोवेळी बदल करण्यात अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे. आपत्कालीन परिस्थितीत अथवा आवश्यक असल्यास मनपाचे इतर रुग्णालयात सुध्दा सेवा पुरवावी लागेल. गरजेनुसार सार्वजनिक आरोग्य विभागाचे रुग्णालय, शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रे येथे काम करावे लागेल, तसेच भागामधील कामकाज करावे लागेल. सद्यस्थितीतील दिलेल्या कामकाजाच्या ठिकाणात बदल करणेकरीता कुठल्याही प्रकारचा दबाव आणल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्दबादल ठरवण्यात येईल.

३३) वरील सर्व मानधनावरील कार्यरत कर्मचारी यांना कोणत्याही प्रकारच्या रजा वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

३४) वरील सर्व मानधनावरील कर्मचारी यांनी दिलेल्या ठिकाणी तसेच वैद्यकिय अधिक्षक / निवासी वैद्यकिय अधिकारी / वैद्यकिय अधिकारी व वैद्यकिय (आरोग्य) अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

३५) सदरचे पद हे पुर्णवेळ अत्यावश्यक सेवा कामकाजाचे असल्याने नमुद मानधन कर्मचारी यांना सोपविलेले उद्दिष्ट पुर्ण करण्याच्या दृष्टीने कामकाज करावे. दैनंदिन कामकाजात व्यत्यय निर्माण होईल, असे कोणतेही वर्तन करु नये.

३६) मानधनावरील कर्मचारी यांना या पदाचे कामकाज करत असतांना इतर कुठल्याही ठिकाणी नोकरी करता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करणेत येऊन अदा झालेले मानधन वसुल करणेत येईल.

३७) उमेदवारांना सेवा कालावधी मध्ये ६ महिन्याचे अगोदर सेवा संपुष्ट करणेकरिता १ महिना अगोदर पुर्व सुचना देणे बंधनकारक राहिल. तसे न केल्यास संबंधिताचे १ महिन्याचे वेतन अदा केले जाणार नाही.

३८) उक्त नमुद मानधन कर्मचारी यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती / शासकीय दस्तावेजाबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील. संबंधितांनी त्यांचेकडेस सोपविलेले कामकाज विहित मुदतीत पुर्ण करणे आवश्यक राहील.

३९) नियुक्ती आदेशातील अटीशर्तीमध्ये वेळोवेळी बदल करणे अथवा नियुक्ती संपुष्टात आणणे याबाबत सर्व अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक सो., यांनी राखुन ठेवलेले आहेत.

४०) न्यायालयीन कामकाज नाशिक न्यायालयीन कक्ष सीमेत करणे बंधनकारक राहील.

} मा.आयुक्त तथा प्रशासक सो.यांचे मान्यतेने.

वैद्यकिय (आरोग्य) अधिकारी
नाशिक महानगरपालिका, नाशिक

प्रत माहितीस्तव :-

१. मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा, नाशिक
२. मा. अतिरिक्त आयुक्त-१, मनपा, नाशिक
३. मा. उप आयुक्त (प्रशासन), मनपा, नाशिक
४. मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मनपा, नाशिक

प्रत कार्यवाहीस्तव :-

१. रुग्णालय प्रमुख,..............................................................................., मनपा, नाशिक
२. संबंधित बिल लिपीक